जनसंपर्क अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर
इमेल-cp.thane.pro@mahapolice.gov.in
मो.क्र.9819208279

प्रेसनोट **दिनांक २०.१२.२०२५**

'' सराईत गुन्हेगारांना अटक करुन मोटरसायकल व मोबाईल चोरीचे एकुण ८ गुन्हे उघड केले बाबत.''

ठाणे पोलीस आयुक्तालयात मोटरसायकल व मोबाईल चोरीच्या होणाऱ्या घटनांना आळा घालणेसाठी मा. वरिष्ठांनी सुचना दिलेल्या होत्या, त्याप्रमाणे गुन्हे शाखेकडुन सदर घटनांना आळा घालणेसाठी उपाययोजना चालु असतानाच सदर गुन्हे उघड करण्यात गुन्हे शाखा, घटक - २, भिवंडी येथील अधिकारी व अंमलदार यांना यश प्राप्त झाले आहे.

गुन्हे शाखा, घटक-२, भिवंडी चे पोहवा/३८३ साबिर शेख व पोशि/अमोल इंगळे यांना मिळालेल्या गुप्त बातमी व तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे वपोनि/श्री.जनार्दन सोनवणे यांच्या अधिपत्याखाली पोउनि/रविंद्र बी. पाटील व पथकाने आरोपी १) सहजील सिराज अहमद मोमीन उर्फ हमजा वय २३ वर्षे रा.खान कंम्पाऊंड, मोमीनपुरा, भिवंडी व २) मुझीब अब्दुल शेख वय ३५ वर्षे रा. आमिनाबाग झोपडपटट्री, नदिनाका, भिवंडी यांना शिताफीने ताब्यात घेतले. आरोपींकडे कौशल्यपुर्ण तपास करुन आरोपी सहजील सिराज अहमद मोमीन उर्फ हमजा याच्याकडून २ मोटरसायकल व आरोपी मुझीब अब्दुल शेख याच्याकडुन ६ मोबाईल असा एकुण १,८७,०००/- रु. किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात येवुन एकुण ८ गुन्हे उघडकीस आणले आहेत.

१) भोईवाडा पो. ठा. गुन्हा रजि. नं. ७५७/२०२५, भा.न्या.सं. कलम ३०३ (२) प्रमाणे.
२) भिवंडी तालुका पो. ठा., ठाणे ग्रामिण गुन्हा रजि. नं. ६४७/२०२५, भा.न्या.सं. कलम ३०३(२) प्रमाणे.
३) भिवंडी शहर पो. ठा. गुन्हा रजि. नं. १०७३/२०२५, भा.न्या.सं. कलम ३०३ (२) प्रमाणे.
४) भिवंडी शहर पो. ठा. गुन्हा रजि. नं. १०७७/२०२५, भा.न्या.सं. कलम ३०३ (२) प्रमाणे.
५) भिवंडी शहर पो. ठा. गुन्हा रजि. नं. १०८३/२०२५, भा.न्या.सं. कलम ३०३ (२) प्रमाणे.
६) निजामपुरा पो. ठा. गुन्हा रजि. नं. १०३३/२०२५, भा.न्या.सं. कलम ३०३ (२) प्रमाणे.
७) शांतीनगर पो. ठा. गुन्हा रजि. नं. १३५३/२०२५, भा.न्या.सं. कलम ३०९ (४) प्रमाणे.
८) भोईवाडा पो. ठा. गुन्हा रजि. नं. ७५१/२०२५, भा.न्या.सं. कलम ३०३ (२) प्रमाणे.

वरील कामगिरी ही श्री.अमरसिंह जाधव, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री.शेखर बागडे, सहा.पोलीस आयुक्त (शोध-१), गुन्हे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा, घटक-२, भिवंडी चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक/जनार्दन सोनवणे, सपोनि/श्रीराज माळी, सपोनि/मिथुन भोईर, पोउनि/रविंद्र बी.पाटील, सपोउनि/सुधाकर चौधरी, सपोउनि/सुनिल साळुंखे, पोहवा/४४९० निलेश बोरसे, पोहवा/८३८ साबिर शेख, पोहवा/२०७६ प्रशांत राणे, पोहवा/६९७३ सुदेश घाग, पोहवा/४३५५ राजेश गावडे, पोशि/१९९७ अमोल इंगळे, पोशि/१५४७ नितीन नंदिवाले, पोशि/६२८३ सर्फराज तडवी, पोशि/७७०० विजय कुंभार चापोशि/२०९३ रविंद्र साळुंखे व मपोहवा/६८३३ माया डोंगरे, मपोहवा/६७४० अनुष्का पाटील यांनी केली आहे.

(शैलेश साळवी)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक तथा जनसंपर्क
अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर